**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University**
**Aurangabad – 431 004, Maharashtra, India**
NACC Re-accredited 'A' Grade
Office PBX : (0240) 24033900/400
Office Tele : (0240) 2403218 / 2403223
Affiliation: (0240)2403118/2403119/2403115
Web Site : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac

स्थापना वर्ष : १९५८

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ**
**औरंगाबाद- ४३१ ००४, महाराष्ट्र, भारत**
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त
Office : Academic Section
कार्यालय :- शैक्षणिक विभाग (संलग्नीकरण)

संदर्भ क्र. : शैक्ष/ संलग्न/ आरएम/ २०२०-२१/ 28980-85 दिनांक :-२६-०२-२०२१

**प्रति,**
**मा. सचिव,**
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, विस्तार भवन,
**मुंबई-४०००३२.**

**विषय :- डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ कार्यक्षेत्रा अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ करीता नवीन प्रस्तावित महाविद्यालयांचे प्रपत्र - "क्ष"अन्वये सकारात्मक शिफारशिसह इरादापत्र मिळणे संदर्भात प्रस्ताव सादर करणे बाबत.**

**संदर्भ :-** १) नवीन प्रस्तावित महाविद्यालयांचे प्रस्ताव विहित प्रक्रिया करुन शासनास सादर करणे बाबत शासन निर्णय दि.१५ सप्टेंबर २०१७.
२) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ सुधारित कमल १०९ पोटकलम ३ खंड (क),(ग),(घ) अन्वये विनिर्दिष्ट करण्यात आलेली तरतुद दि.०८-१२-२०२०.
३) विद्यापीठाने प्रसिध्द केलेला पंचवार्षिक बृहत आराखडा व वार्षिक वृहत आराखडा नुसार प्रसिध्द करण्यात आलेले स्थळ बिंदु प्रमाणे प्रसिध्द केलेली जाहिरात दि.२१-१२-२०२० अन्वये विद्यापीठास प्राप्त झालेले प्रस्ताव दि.३१ डिसेंबर २०२०.
४) नविन प्रस्तावित महाविद्यालयाच्या ठिकाणी शासन निर्णय दि.१५-०९-२०१७ अन्वये विहित पायाभुत सुविधा उपलब्ध आहे किंवा नाही याबाबत तपासणी करण्यासाठी मा.कुलगुरु महोदयांनी नियुक्त केलेल्या विविध चौकशी समित्या दि.०६-०२-२०२१.
५) अधिष्ठाता मंडळाने नविन प्रस्तावित महाविद्यालयाचे प्रस्ताव छाननी / तपासणी करुन मा.कुलगुरु महोदय व व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस दि. १६-०२-२०२१, दि. २०-०२-२०२१ व दि. २१-०२-२०२१.
६) नविन प्रस्तावित महाविद्यालयाचे प्रस्ताव शासनास शिफारशीत करणे बाबत व्यवस्थापन परिषदेने घेतलेला निर्णय दि.१७-०२-२०२१, दि. १८-०२-२०२१ व दि. २३-०२-२०२१.
७) नविन प्रस्तावित महाविद्यालयाच्या संदर्भात मा.कुलगुरु महोदयांनी घेतलेली सुनावणी दि.२२-०२-२०२१ व दि. २४-०२-२०२१.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने मा. कुलगुरु महोदयांनी दिलेल्या आदेशानुसार आपणास विनंती पुर्वक कळविण्यात येते की, संदर्भ क्र. (३) अन्वये विद्यापीठ कार्यक्षेत्रातील अनुज्ञेय स्थळबिदु साठी विद्यापीठाने वार्षिक व पंचवार्षिक बृहत आराखड्यानुसार जाहिरात प्रसिध्द करुन दि.३१-१२-२०२० पर्यत प्राप्त झालेल्या एकुण १८२ प्रस्तावांच्या संदर्भात नविन प्रस्तावित महाविद्यालयाच्या ठिकाणी नियमामध्ये विहित केल्यानुसार पायाभुत सुविधा उपलब्ध आहे किंवा नाही या संदर्भात पाहणी / तपासणी करण्यासाठी मा.कुलगुरु महोदयांनी संदर्भ क्र. (४) अन्वये चौकशी / तज्ञ समिती नियुक्त करण्यात आलेली होती तद्अनुषंगाने प्राप्त झालेल्या तज्ञ समितीच्या अहवालानुसार प्राप्त प्रस्तावांची अधिष्ठाता मंडळा मार्फत छाननी तपासणी करुन अधिष्ठाता मंडळाने मा.कुलगुरु महोदय व व्यवस्थापन परिषदेस यथायोग्य शिफारशिसह अहवाल सादर करण्यात आला.

प्रस्तुत प्रकरणी शासन निर्णय दि.१५-०९-२०१७ अन्वये निश्चित करण्यात आलेले निकष, तज्ञ समितीने सादर केलेला अहवाल, अधिष्ठाता मंडळाची शिफारस, गावाची लोकसंख्या, विहित रक्कमेचा एफ.डी., दोन महाविद्यालयामधील अंतर, प्रस्तावित ठिकाणी नविन महाविद्यालयाची आवश्यकता, शैक्षणिक गुणवत्ता, उपलब्ध पात्र विद्यार्थ्यांची संख्या, तसेच उपलब्ध पायाभुत सुविधा इत्यांदी व तत्सम बाबीचा विचार करुन ज्या संस्थेची नविन प्रस्तावित महाविद्यालये प्रस्तुत अटी / शर्ती व निकष पुर्ण करीत असतील अशा **प्रपत्र - "क्ष"** अन्वये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या नविन प्रस्तावित **एकुण १२** महाविद्यालयांची विविध कारणे नमुद करुन **सकारात्मक शिफारशीसह** इरादापत्र मिळणे किंवा पुढील यथायोग्य कार्यावाहिस्तव आपल्या कार्यालयास सादर करण्यात येत आहे.

सोबत:- वरील प्रमाणे.

Rsuryawanshi

**कुलसचिव**

**प्रतिलिपी :-**

१. मा. संचालक, उच्च शिक्षण, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव सादर .
२. मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग, रेल्वे स्टेशन रोड, औरंगाबाद यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव सादर .

स्वाक्षरीत /-

**कुलसचिव**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

**शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ करिता विद्यापीठाने निश्चित केलेला बृहत आराखडा / बिंदु करिता प्राप्त झालेल्या नविन प्रस्तावित महाविद्यालयाच्या संदर्भात संकिर्ण माहिती तक्ता प्रपत्र-``क्ष``**

| अ. क्र. | अर्जदार संस्थेचे नाव / पत्ता व अध्यक्षाचे नाव (ई-मेल व दुरध्वनी क्रमांक) | प्रस्तावित अभ्यासक्रमासह नवीन महाविद्यालयाचे नाव व विद्याशाखा | अध्यादेश १५१ अन्वये निर्धारित प्रक्रिया शुल्क व भरलेले शुल्क | प्रस्तावित महाविद्यालयाचे ठिकाण बृहत आराखडयात निश्चित करण्यात आलेले आहे काय? तद्अनुषंगाने ठिकाणाचे नाव | मा. कुलगुरु महोदयांनी नियुक्त केलेल्या तज्ञ समितीने सादर केलेल्या अहवालानुसार तज्ञ समितीची शिफारस (यथायोग्य शेरासह सकारात्मक / नकारात्मक) | सकारात्मक व नकारात्मक शिफारस करण्याची कारणे | व्यवस्थापन परिषदेची शिफारस |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १) | मायनॉरिटी हयुमन डेवहल्पमेन्ट फाऊडेशन संचलित,सातारा परिसर औरंगाबाद. अध्यक्ष,श्री.जफार हमिद पटेल, मो.९८२२११६७०८ C.C.१९५८ | इकरा ऊर्दु कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सातारा परिसर औरंगाबाद (कला वाणिज्य व विज्ञान). | निर्धारीत केलेले १,११,०००/- कला, वाणिज्य व विज्ञान भरलेले शुल्क १,११,०००/- कला, वाणिज्य व विज्ञान | होय सातारा परिसर | तज्ञ समितीने सकारात्मक शिफारस केलेली आहे. | १) नवीन प्रस्तावित महाविद्यालयाचे ठिकाण बृहत आराखडयामध्ये समाविष्ठ **आहे**<br>२) नवीन प्रस्तावित महाविद्यालयाच्या स्थळबिंदूच्या ठिकाणी महानगरपालिका क्षेत्रासाठी नमुना आट प्रमाणे निर्धारित नियमानुसार स्वत:ची जागा उपलब्ध आहे.<br>३) नवीन प्रस्तावित महाविद्यालय निहाय संस्थेने पारंपारिक अभ्यासक्रमासाठी रुपये ७ लाख किमान पाच वर्ष मुदत ठेव / एफ.डी. राष्ट्रीयकृत किंवा शेडयुल्ड बँकेचे असणे आवश्यक आहे. प्रस्तुत एफ.डी. विद्यापीठ व संस्थेच्या नावे संयुक्तपणे उपलब्ध **आहे**<br>४) संस्थेने मागील पाच वर्षाचे लेखा परिक्षण अहवाल प्रस्तावासोबत जोडलेले **आहे**<br>५) संस्थेचे आर्थिक व्यवहार राष्ट्रीयकृत बँकेमार्फत केले जातात.<br>६) भौतिक पायाभूत सुविधा व इतर तत्सम बाबीं तसेच त्रुटयांच्या संदर्भात तज्ञ समितीने सादर केलेल्या अहवालानुसार केलेली शिफारस **सकारात्मक आहे**<br>७) नवीन प्रस्तावित महाविद्यालयाच्या ठिकाणी कनिष्ठ महाविद्यालय आहे.<br>८) संस्थेने प्रस्तावासोबत अकृषी प्रमाणपत्र, जंगम मालमत्ता प्रमाणपत्र, शैक्षणिक अनुभवाबावत दस्ताऐवज तसेच शासन निर्णय दि. १५ सप्टेंबर, २०१७ अन्वये सर्व आश्वासन पत्र सोबत जोडण्यात आलेले **आहे**<br>९) प्रस्तुत प्रकरणी कार्यालायाने कळविलेल्या त्रुटया /कमतरता संस्थेने चौकशी समितीच्या माध्यामातुन पुर्ण केलेल्या **आहे**<br>१०) प्रस्तुत संस्था अल्पसंख्यांक आहे. | फक्त बी.ए. ऊर्दू अभ्यासक्रमासाठी सकारात्मक शिफारस करण्यात येत आहे. |